सकाळ
सिंधुदुर्ग, सोमवार, १९ डिसेंबर २०२२

# दोडामार्ग येथे राष्ट्रीय चर्चासत्र

दोडामार्ग, ता. १८ : येथील हळबे महाविद्यालयात २१ व २२ ला अर्थशास्त्र विभागातर्फे आयसीएसएसआर मुंबई पुरस्कृत 'हवामान बदल आणि भारतीय शेती' या विषयावर आंतरविद्या दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले आहे. २१ ला सकाळी नऊला नावनोंदणी आणि दहाला चर्चासत्राचे उद्घाटन होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दापोली कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत उपस्थित राहणार आहेत. २२ ला सायंकाळी चारला सांगता होईल. समारोपासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून कोकण कृषी विद्यापीठाचे संशोधक संचालक डॉ. संजय भावे उपस्थित राहणार आहेत. उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांनी केले.